विस्तारीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत उपचारांच्या यादीत सुधारणा करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**शासन निर्णय क्र. मफुयो-२०२६/ ई१६२१२१६/MJPJAY&AB-PMJAY**
**जी.टी. रूग्णालय आवार, १० वा मजला,**
**मंत्रालय, मुंबई.**
**दि. १५ ऑक्टोबर,२०२६**

**वाचा :-**

१ .सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य - ६ , दि. २८ जुलै, २०२३.
२ .सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. मफुयो-२०२५/प्र.क्र.८६/ई-१०४४४९४/आरोग्य - ६, दि. १७ एप्रिल, २०२५.
३ . Office Memorandum No. - S- १२०१८/२३/२०१९ - NHA Dated २५-०८-२०२५ by Government of India- Ministry of Health & Family Welfare (National Health Authority)
४. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. मफुयो-२०२५/ई-१०४४४९४/ MJPJAY&AB-PMJAY दि. ४ नोव्हेंबर, २०२५.
५ .राज्य आरोग्य हमी सोसायटी यांचेकडील पत्र क्र. राआहसो/प्रिऑथ/वकास/११६७५/२१८३/२०२६ दि. ०७/१०/२०२६

**प्रस्तावना :-**

विस्तारीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत दि. २८.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या उपचारांच्या यादीत व त्यांच्या दरांमध्ये सुधारणा करण्याबाबत उपरोक्त वाचा क्र. ४ मधील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार निश्चित करण्यात आलेल्या एकूण २३९९ उपचारांची यादी उक्त शासन निर्णयाच्या परिशिष्ट - १ मध्ये नमूद करण्यात आली आहे. यापैकी शासकीय रुग्णालयांसाठी राखीव ठेवलेल्या २२३ उपचारांची यादी उक्त शासन निर्णयाच्या परिशिष्ट २ मध्ये नमूद करण्यात आली आहे. सदर उपचारांची अंमलबजावणी दि. २४.०२.२०२६ पासून केंद्र शासनाअंतर्गत राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या TMS २.० प्रणालीव्दारे सुरु करण्यात आली आहे.

२. सदर उपचारांपैकी कर्करोग या विशेषज्ञ सेवेतील उपचारांमध्ये Positron Emission Tomography - Computed Tomography (PET-CT) ही निदान प्रक्रिया काही उपचारांसाठी अतिरिक्त निदान प्रक्रिया (Add on Diagnostic Procedure) म्हणून समाविष्ट करावी. तसेच PET-CT या निदान प्रक्रियेचा स्वतंत्र/नियमित (Regular/Primary) उपचार प्रक्रिया म्हणून समावेश करण्यात यावा अशा आशयाच्या मागण्या वारंवार प्राप्त होत होत्या. त्यानुसार उपरोक्त वाचा क्र. २ मधील शासन निर्णयान्वये आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय यांच्या

अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या अभ्यास समितीस याविषयी अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले होते. सदर अभ्यास समितीचा अहवाल उपरोक्त वाचा क्र. ५ अन्वये शासनास प्राप्त झाला आहे.

३. उपरोक्त वाचा क्र. ४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. १.(३) नुसार योजनेअंतर्गत समग्र यादीतील उपचारांची अंमलबजावणी सुर झाल्यानंतर आवश्यकतेनुसार आढावा घेऊन एकूण उपचारांची संख्या निश्चित करणे, उपचारांच्या संख्येत, वर्णनात व दरात बदल करणे, शासकीय राखीव उपचार यामध्ये भर घालणे किंवा कमी करणे, अपवादात्मक परिस्थितीत विशिष्ट क्षेत्रासाठी राखीव उपचार खाजगी रुग्णालयांना खुले करणे याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना राहतील, अशी तरतूद आहे.

४. उपरोक्त वाचा क्र. ४ मधील शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या २३९९ उपचारांच्या समग्र यादीत कर्करोगावरील उपचारांशी संबंधित एकूण ५१५ उपचारांचा समावेश आहे. त्यापैकी ४४ उपचारांकरिता PET-CT निदान प्रक्रिया पॅकेजसोबत अतिरिक्त निदान प्रक्रिया (Add on Diagnostic Procedure) म्हणून समाविष्ट आहे. त्याशिवाय अभ्यास समितीने, अतिरिक्त ६३ उपचारांकरिता PET-CT निदान प्रक्रिया पॅकेजसोबत अतिरिक्त निदान प्रक्रिया (Add on Diagnostic Procedure) म्हणून समाविष्ट करण्याची शिफारस केली आहे. तसेच PET-CT निदान प्रक्रिया विशिष्ट निकषांची पूर्तता करणाऱ्या अंगीकृत रुग्णालयांसाठी स्वतंत्र/नियमित (Regular/Primary) प्रक्रिया म्हणून समाविष्ट करण्याची समितीने शिफारस केली आहे.

५. कर्करोग उपचारांशी संबंधित PET-CT निदान प्रक्रिया समाविष्ट करण्याबाबत अभ्यास समितीने केलेल्या शिफारसी मान्य करुन त्या लागू करण्यासाठी तसेच वाचा क्र. ३ अन्वये राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाने समाविष्ट केलेल्या "Post-Transplant Package (After Completion of १२ months)"- Package code: OT००1G याचा समावेश करण्यासाठी उपरोक्त वाचा क्र. ४ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट १ मधील उपचारांच्या समग्र यादीत सुधारणा करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१. विस्तारीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत उपरोक्त वाचा क्र. ३ मधील शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या २३९९ उपचारांच्या समग्र यादीपैकी यासोबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये नमूद केलेल्या एकूण ६३ कर्करोग उपचारांकरिता Positron Emission Tomography - Computed Tomography (PET-CT) ही निदान प्रक्रिया, अतिरिक्त निदान प्रक्रिया (Add on Diagnostic Procedure) म्हणून समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. याशिवाय, सोबतच्या **परिशिष्ट-२** मध्ये नमूद केलेल्या ज्या विशिष्ट कर्करोगांसाठी (Malignancies) रोगाचे टप्पानिर्धारण (Staging), उपचारास प्रतिसादाचे मूल्यमापन (Response Assessment) तसेच रोगाच्या पुनरावृत्तीचे मूल्यमापन (Recurrence Evaluation) करण्यासाठी Diagnostic PET-CT Scan ची वैद्यकीय उपयुक्तता स्थापित झालेली आहे, अशा निवडक १३ प्रकारच्या कर्करोग उपचारांसाठी नमूद केलेली आवश्यक कागदपत्रे पूर्तता करण्याच्या अधिन राहून PET-CT निदान प्रक्रिया ही स्वतंत्र/नियमित (Regular/Primary) प्रक्रिया म्हणून समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. **अंगीकृत रुग्णालयांसाठी पात्रता व अटी:-**

१. PET-CT ही स्वतंत्र/नियमित (Regular/Primary) निदान प्रक्रिया केवळ परिशिष्ट-२ मध्ये नमूद केलेल्या एकूण १३ प्रकारच्या कर्करोग उपचार सुविधा देण्यासाठी पात्र असलेल्या अंगीकृत रुग्णालयांमार्फत अनुज्ञेय राहील. PET-CT तपासणी करणाऱ्या अंगीकृत रुग्णालयात आवश्यक तांत्रिक सुविधा, उपकरणे व पात्र मनुष्यबळासह स्वतःचे (In-house) PET-CT केंद्र उपलब्ध असणे आवश्यक राहील. PET-CT तपासणीची आवश्यकता संबंधित तज्ञ डॉक्टरांनी वैद्यकीयदृष्ट्या प्रमाणित केलेली असावी.

२. PET-CT या स्वतंत्र/नियमित (Regular/Primary) निदान प्रक्रियेसाठी पूर्वमान्यता (Pre-Authorization) प्राप्त करणे संबंधित अंगीकृत रुग्णालयास बंधनकारक राहील. परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्यानुसार पूर्वमान्यतेसाठी रुग्णाचा निदान अहवाल, कर्करोगाचा प्रकार व टप्पानिर्धारण, तपासणीची वैद्यकीय आवश्यकता, संबंधित तज्ज्ञ डॉक्टरांचे अभिप्राय आणि आवश्यक वैद्यकीय कागदपत्रे सादर करणे तसेच दावा सादर करताना तपासणीचा अहवाल, आवश्यक वैद्यकीय नोंदी व योजनेंतर्गत विहित केलेली इतर कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. या व्यतिरिक्त कोणत्याही बाबींची पूर्तता करणे आवश्यक असल्यास, राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाचे अभिप्राय घेऊन राज्य आरोग्य हमी सोसायटीने निर्गमित केलेले आदेश बंधनकारक राहतील.

४. PET-CT या स्वतंत्र/नियमित (Regular/Primary) निदान प्रक्रियेचे दर राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या HBP २०२२ मधील Add-on Procedure साठी निर्धारित केलेल्या दरानुसार खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत-

| PET- CT Scan **प्रकार** | **दर (रुपये)** |
|---|---|
| Whole Body | २०,५००/ |
| Brain | १४,६५०/ |
| Gallium ६८ | १५,०००/ |
| Cardiac | १,५००/ |

५. या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य आरोग्य हमी सोसायटीने राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाला प्रस्ताव सादर करुन संबंधित संगणक TMS २.० प्रणालीमध्ये आवश्यक बदल करुन घ्यावेत.

६. याशिवाय, वाचा क्र. ३ अन्वये राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाने HBP २०२२ मध्ये समाविष्ट केलेल्या “Post-Transplant Package (After Completion of १२ months)”- Package code: OT००1G याचा समावेश उपरोक्त वाचा क्र. ४ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट-१ च्या उपचारांच्या समग्र यादीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१०१५१३२२३४९३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHANDRAKANT ARUN VIBHUTE

Digitally signed by CHANDRAKANT ARUN VIBHUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=D772C1C0413F707CB062D972B2618CF3943831624F050BADD4BD9AEA24219790, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B37242131913CE4AD7FFA0CAA314C8163271F8AF6410B5DFF1FC5B4C3CC19B76, cn=CHANDRAKANT ARUN VIBHUTE
Date: 2026.10.15 20:29:00 +05'30'

(चंद्रकांत विभूते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन , मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) मा. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९) मा. राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०) सर्व सन्माननिय संसद/विधानपरिषद/विधानसभा सदस्य.
११) मा. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक.
१२) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१३) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) अपर मुख्य सचिव (न.वि.-२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई
१७) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई
१८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१९) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

२०) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई-०१
२१) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई-०१
२२) सर्व विभागीय आयुक्त
२३) सर्व जिल्हाधिकारी
२४) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
२५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
२६) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई
२७) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
२८) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
२९) सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३०) सह संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
३१) उप संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
३२) जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व)
३३) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
३४) सर्व अवर सचिव/ कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
३५) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत
३६) निवड नस्ती.

# परिशिष्ट -१

**List of procedures for which Positron Emission Tomography - Computed Tomography (PET-CT) included as Add on Diagnostic Procedure ( MG098A)**

| Sr. No | Speciality | Package Name | Procedure Name |
|---|---|---|---|
| 1 | Surgical Oncology | Segmental Mandible Excision | Segmental Mandible Excision |
| 2 | Surgical Oncology | Buccal Mucosal Resection & Reconstruction | Full Thickness Buccal Mucosal Resection & Reconstruction |
| 3 | Surgical Oncology | Breast Carcinoma | Wide Excision of Breast for Tumour |
| 4 | Surgical Oncology | Head And Neck | Hemi-mandibulectomy |
| 5 | Medical Oncology | CT for CA Breast | Cyclophosphamide + Epirubcin Cyclophosphamide - 600 mg /m2 D1 Epirubicin -90mg/m2 D1 every 21 days |
| 6 | Medical Oncology | CT for CA Breast | Weekly Paclitaxel for Adjuvant Therapy Paclitaxel 80mg/m2 every week |
| 7 | Medical Oncology | CT for CA Breast | Weekly Paclitaxel in metastatic setting Paclitaxel 80mg/m2 every week |
| 8 | Medical Oncology | CT for CA Breast | Cyclophosphamide + Methotrexate + 5 - FU Cyclophosphamide - 100mg/m2 orally D1-D14 Methotrexate 40mg/m2 IV D1 D8 5FU 600 mg/m2 D1, D8 every 28 days |
| 9 | Medical Oncology | CT for CA Breast | Docetaxel + Cyclophosphamide Docetaxel 75mg/m2 D1 Cyclophosphamide 600 mg/m2 D1 every 21 days |
| 10 | Medical Oncology | CT for CA Breast | Trastuzumab Trastuzumab 8 mg/Kg in Cycle 1 D1 Trastuzumab 6 mg/kg D1 from C2 every 21 days |
| 11 | Medical Oncology | CT for CA Breast | Tamoxifen Tamoxifem 20 mg orally daily |
| 12 | Medical Oncology | CT for CA Breast | Letrozole Letrozole 2.5 mg orally daily |
| 13 | Medical Oncology | CT for CA Breast | Carboplatin + Paclitaxel Paclitaxel 175mg/m2 D1 Carboplatin AUC 5-6 D1 every 21 days |
| 14 | Medical Oncology | CT for CA Breast | Capecitabine Capecitabine - 1000mg/m2 orally twice daily D1-D14 every 21 days |

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | Medical Oncology | CT for CA Breast | Carboplatin + Gemcitabine<br>Gemcitabine - 1000mg/m2 D1 D8<br>Carboplatin AUC 2 D1 D8<br>Gemcitabine - 1000mg/m2 D1 D8<br>Carboplatin AUC 5-6 D1 only |
| 16 | Medical Oncology | CT for CA Breast | Cyclophosphamide + Adriamycin<br>Cyclophosphamide - 600 mg /m2 D1<br>Adriamycin - 60mg/m2 D1 every 21 days |
| 17 | Medical Oncology | CT for CA Breast | Fulvestrant<br>Fulvestrant 500 mg D1 D15 D28 then every 28 days.per dose13200 (39600 in cycle1 ) then 13200 per month - (per dose 45000 in cycle1 ) then 15000 per month |
| 18 | Medical Oncology | CT for CA Breast | Paclitaxel<br>Paclitaxel 175 mg/m2 D1 every 21 days |
| 19 | Medical Oncology | CT for CA Breast | Exemestane<br>Exemestane 25 mg orally daily (q 3 monthsly) |
| 20 | Medical Oncology | CT for Cervical Cancer | Carboplatin + Paclitaxel<br>Paclitaxel 175mg/m2 D1<br>Carboplatin AUC 5-6 D1 every 21 days |
| 21 | Medical Oncology | CT for Cervical Cancer | Cisplatin<br>Cisplatin 40 mg/m2 every week |
| 22 | Medical Oncology | CT for Endometrial Cancer | Carboplatin + Paclitaxel<br>Paclitaxel 175mg/m2 D1<br>Carboplatin AUC 5 D1 every 21 days |
| 23 | Medical Oncology | CT for Endometrial Cancer | Cisplatin + Doxorubicin<br>Doxorubicin 60 mg/m2 D1<br>Cisplatin 50mg/m2 every 3 weeks |
| 24 | Medical Oncology | CT for Endometrial Cancer | Lipodox + Carboplatin<br>Lipopdox 30 mg/m2 D1<br>Carboplatin AUC 5 D1 every 28 days |
| 25 | Medical Oncology | CT for Endometrial Cancer | Carboplatin + Gemcitabine<br>Gemcitabine - 1000mg/m2 D1 D8<br>Carboplatin AUC 2 D1 D8<br>Gemcitabine - 1000mg/m2 D1 D8<br>Carboplatin AUC 5-6 D1 only every 3 weeks |
| 26 | Medical Oncology | CT for Endometrial Cancer | Anastrozole<br>1 mg orally daily (for 3 months) |
| 27 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Cisplatin + Docetaxel<br>Docetaxel 75 mg/m2 D1<br>Cisplatin 75 mg/m2 D1 every 21 days |
| 28 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Cisplatin<br>Cisplatin 100mg/m2 every 21 days |

| | | | |
|---|---|---|---|
| 29 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Carboplatin + Gemcitabine<br>Gemcitabine 1000 mg/m2 D1 D8<br>Carboplatin AUC 5-6 D1 every 21 days |
| 30 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Docetaxel + Cisplatin + 5 FU<br>Docetaxel 75 mg/m2 D1<br>Cisplatin 75 mg/m2 D1<br>5 FU 750 mg/m2 D1- D5 every 21 days |
| 31 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Docetaxel<br>Docetaxel 20mg/m2 every week |
| 32 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Docetaxel<br>Docetaxel 75 mg/m2 D1 every 21 days |
| 33 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Etoposide + Carboplatin<br>Etoposide 100mg/m2 D1 - D3<br>Carboplatin AUC 5-6 D1 every 21 days |
| 34 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Etoposide + Cisplatin<br>Etoposide 100mg/m2 D1 - D3<br>Cisplatin 75-100 mg/m2 D1 every 21 days |
| 35 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Gemcitabine<br>Gemcitabine 1000 mg/m2 D1 D8 every 21 days |
| 36 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Gemcitabine + Cisplatin<br>Gemcitabine 1000 mg/m2 D1 D8<br>Cisplatin 75 mg/m2 D1 every 21 days |
| 37 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Paclitaxel + Carboplatin<br>Paclitaxel 80mg/m2 D1<br>Carboplatin AUC 2 D1 every week |
| 38 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Paclitaxel + Carboplatin<br>Paclitaxel 175mg/m2 every 21 days |
| 39 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Paclitaxel<br>Paclitaxel 80mg/m2 every week |
| 40 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Paclitaxel<br>Paclitaxel 175mg/m2 every 21 days |
| 41 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Carboplatin<br>Carboplatin AUC 2 every week |
| 42 | Medical Oncology | CT for CA Head & Neck | Cisplatin<br>Cisplatin 40mg/m2 every week |
| 43 | Medical Oncology | CT for CA Prostate | Paclitaxel + Carboplatin<br>Paclitaxel 175mg/m2 D1<br>Carboplatin AUC 5-6 D1 every 21 days |
| 44 | Medical Oncology | CT for CA Prostate | Docetaxel<br>Docetaxel 20mg/m2 D1 every week |

| | | | |
|---|---|---|---|
| 45 | Medical Oncology | CT for CA Prostate | Abiraterone 1000 mg + Prednisolone 10mg daily<br>Once every month |
| 46 | Medical Oncology | CT for B - Cell NHL - High Grade<br>(Except Burkitt's & PCNSL) | Rituximab + Cyclophosphamide + Etoposide + Prednsiolone<br>Rituximab 375mg/m2<br>Cyclophosphamide 750 mg/m2<br>Vincristine 1.4 mg/m2, on Day1<br>Etoposide 65mg/m2 Day 1 to 3<br>Prednisolone 100 mg Day 1-5<br>Total 6 cycles, repeat 21 days |
| 47 | Medical Oncology | CT for B - Cell NHL - High Grade<br>(Except Burkitt's & PCNSL) | Rituximab + Cyclophosphamide + Doxorubicin + Prednsiolone<br>Rituximab 375mg/m2<br>Cyclophosphamide 750 mg/m2<br>Doxorubicin 50mg/m2<br>Vincristine 1.4 mg/m2 on Day1<br>Prednisolone 100 mg Day 1-5<br>Total 6 cycles, repeat 21 days |
| 48 | Medical Oncology | CT for High - Grade NHL - B Cell | Rituxmab + Dexamethasone + High Dose Cytarabine + Cisplatin<br>Rituximab 375mg/m2 Day 1<br>Cytarabine 2g/m2 BD on day 2<br>Dexamethasone 40 mg Day 1 - 4<br>Cisplatin 75mg/m2 or<br>Carboplatin AUC-5 on day 1<br>Cycle to be repeated every 21days |
| 49 | Medical Oncology | CT for Burkitt's NHL | Codox - M - IVAC- cyclophosphamide, vincristine, doxorubicin, high-dose methotrexate / ifosfamide, etoposide, high-dose cytarabine)<br>GMALL (German multicenter acute lymphoblastic leukemia)<br>Berlin- Frankfurt -Munster<br>Hyper CVAD (cyclophosphamide, Vincristine, Adriamycin,Dexamethasone |
| 50 | Medical Oncology | CT for Peripheral T - Cell Lymphoma | CHOEP<br>Cyclophosphamide 750mg/m2 D1<br>Vincristine 1.4mg/m2 D1<br>Adriamycin 50 mg/m2 D1<br>Etoposide 100mg/m2 D1-3<br>Prednisolone 100 mg D1-5<br>Every 21days. Total 6 cycles |

| | | | |
|---|---|---|---|
| 51 | Medical Oncology | CT for Peripheral T - Cell Lymphoma | CHOP<br>Cyclophosphamide 750mg/m2 D1<br>Vincristine 1.4mg/m2 D1<br>Adriamycin 50 mg/m2 D1<br>Prednisolone 100 mg D1-5<br>Every 21days. Total 6 cycles |
| 52 | Medical Oncology | CT for Peripheral T - Cell Lymphoma | SMILE<br>Methotrexate 2gm/m2 D1<br>Ifosfamide 1500mg/m2 D2-4<br>Etoposide 100mg/m2 D2-4<br>L-asparginase 6000U/m2 D8,10,12,14,16,18,20<br>Dexamethasone 40mg D1-4 every 28 days |
| 53 | Medical Oncology | CT for NK - T Cell Lymphoma | GELOX<br>Gemcitabine 1000mg/m2 D1 and D8<br>Oxaliplatin 130mg/m2 D1<br>L- asparginase 6000 U/m2 D1-7<br>Repeat every 21 days |
| 54 | Medical Oncology | CT for NK - T Cell Lymphoma | LVP<br>L-asparginase 6000U/m2 D1-5<br>Vincristine 1.4mg/m2 D1<br>Prednisolone 100mg D1-5<br>Repeat every 21 days |
| 55 | Medical Oncology | CT for Hodgkin's Lymphoma | COPP<br>Cyclophosphamide 650mg/m2 D1, 8<br>Vincristine 1.4mg/m2 D1, 8<br>Procarbazine 100 mg/m2 D1-14<br>Prednisolone 40mg/m2 D1-14<br>Every 28days. Total 6 - 8 cycles |
| 56 | Medical Oncology | CT for Hodgkin's Lymphoma | ABVD<br>Adriamycin 25mg/m2<br>Bleomycin 10unit/m2<br>Vinblastine 6mg/m2<br>Dacarbazine 375 mg/m2 Day 1,15<br>Every 28 days for 6 cycles |
| 57 | Medical Oncology | CT for Hodgkin's Lymphoma | AEVD<br>Adriamycin 25mg/m2<br>Vinblastine 6mg/m2<br>Dacarbazine 375 mg/m2 Day 1,15<br>Etoposide 65mg/m2 Day 1-3, 15-17<br>Every 28 days for 6 cycles |
| 58 | Medical Oncology | CT for Relapsed Hodgkin Lymphoma | ICE<br>Ifosfamide 1.5 mg/m2 D1-3<br>Carboplatin AUC5 D2<br>Etoposide 100mg/m2 D1-3<br>Every 3 weeks |

| | | | |
|---|---|---|---|
| 59 | Medical Oncology | CT for Relapsed Hodgkin Lymphoma | MINE<br>Ifosfamide 4 gm/m2 over 3days (D1-3)<br>Mitoxantrone 8mg/m2<br>Etoposide 65mg/m2 D1-3<br>Every 3 weeks |
| 60 | Medical Oncology | CT for Relapsed Hodgkin Lymphoma | PTCL - GDP<br>Gemcitabine 1000mg/m2 D1 and D8<br>Dexamethasone 40mg D1-4<br>Cisplatin 75mg/m2 D1 or<br>Cacrboplatin AUC-5<br>Every 3 weeks |
| 61 | Medical Oncology | CT for Relapsed NHL & HL | DHAP<br>Dexamethasone 40mg D1-4<br>Cisplatin 100mg/m2 or<br>Carboplatin AUC-5D1<br>Cytarabine 2 gm/m2 BD D2<br>Repeat every 21 days |
| 62 | Medical Oncology | CT for MM / Amyloidosis / POEMS | Lenalidomide + Dexamethasone<br>Lenalidomide 25 mg daily Day1-21<br>Dexamethasone 40mg Day 1, 8, 15, 22<br>Every 28days |
| 63 | Medical Oncology | CT for MM / Amyloidosis / POEMS | Pomalidomide + Dexamethasone<br>Pomalidomide 4 mg daily Day 1-21<br>Dexamethasone 40mg Day 1, 8, 15, 22<br>Every 28 days |

**************

# परिशिष्ट- २

| List of Malignancies for which PET- CT Scan is included as Regular/Primary diagnostic procedure | | | |
|---|---|---|---|
| **Sr.No** | **Malignancy** | **Mandatory documents at the time of Pre-auth** | **Mandatory documents at the time of Claims** |
| 1 | Non- Small Cell Lung Cancer (NSCLC) | Biopsy + Clinical Examination | Images and Reports; Plan of Treatment |
| 2 | Hodgkin Lymphoma | Biopsy + Clinical Examination | Images and Reports; Plan of Treatment |
| 3 | Non- Hodgkins Lymphoma | Biopsy + Clinical Examination | Images and Reports; Plan of Treatment |
| 4 | Head & Neck Squamous Cell Carcinoma (Stage III-IV) | Biopsy and CT/MRI of Head and Neck | Images and Reports; Plan of Treatment |
| 5 | Esophageal Cancer | Biopsy + Clinical Examination | Images and Reports; Plan of Treatment |
| 6 | Cervical Cancer (Locally Advanced) | Biopsy + Clinical Examination | Images and Reports; Plan of Treatment |
| 7 | Melanoma (Stage III- IV) | Biopsy + Clinical Examination | Images and Reports; Plan of Treatment |
| 8 | Multiple Myeloma | Biopsy + Clinical Examination | Images and Reports; Plan of Treatment |
| 9 | Unknown Primary Tumour with Metastatic Disease | Biopsy + Clinical Examination | Images and Reports; Plan of Treatment |
| 10 | Paediatric Hodgkins and Non-Hodgkins Lymphoma | Biopsy + Clinical Examination | Images and Reports; Plan of Treatment |
| 11 | Locally advanced Breast Cancer | Clinical examination and biopsy | Images and Reports; Plan of Treatment |
| 12 | Locally advanced Ovarian Cancer | Biopsy/ Ultrasonography and CA-125 level | Images and Reports; Plan of Treatment |
| 13 | Paediatric Sarcomas | Biopsy + Clinical Examination | Images and Reports; Plan of Treatment |

*******************